म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बाल-वा
दा. क्र. ८८०८

IRBK-0108808
IRBK-0108808

* नवसाक्षर प्रौढासाठी *

# उद्याचा महाराष्ट्र

राजकीय ग्रंथ संग्रहालय,
अनुक्रम 3009
विभाग पी.वी.
क्रमांक 2263
नों. दि. 4/4/5
वाचनालय शाखा

• लेखक

व. द. जोशी

• किंमत

२५ नवे पैसे

म. प्रे. ... वाचनालय शाखा.
क्र. ८८०८
वि. पी.वी.

• द्वितीय श्रेणी

IRBK-0108808

विद्या प्रकाशन
४५० बुधवार पेठ, पुणें २.

प्रकाशक
व्ही. आर. शिंगरे,
विद्या प्रकाशन,
४५० बुधवार पेठ, पुणें २.

मुद्रक
व्ही. आर. शिंगरे,
सर्वोदय मुद्रणालय,
४५० बुधवार पेठ, पुणें २.

संग्रहालय
अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
वाचनालय शाखा.

# उद्याचा महाराष्ट्र

स्टेशन आलं. गाडी थांबली. हातात ट्रंका व वळकट्या घेऊन मुलं तयार होती, ती डब्यात बसली.

लगेच गाडी चालू झाली. मी खिडकीजवळ बसलो होतो. खिडकीतून बाहेर पहात होतो.

कातरवेळ झाली होती. बाहेरचा देखावा उदास दिसत होता. बाजूला ओसाड माळ आणि भकास टेकड्या होत्या. त्यातून वळणे घेत, धूर ओकीत, गाडी चालली होती. फार वेळ तो देखावा

बघवेना. 'राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा' असं गुणगुणत मी आत वळलो.

मघाशी घुसलेली मुलं ट्रंका पसरून त्यांच्यावर बसली. त्यांच्या खिदळण्याला रंग चढला होता. कानात वारं शिरलेली वासरंच होती ती! मराठी सातवीची परीक्षा आटपून ती आली होती. ती एकमेकांची थट्टा करत होती. आपल्या मनातील बेत एकमेकाना सांगत होती.

एक फेटेवाला मुलगा म्हणाला, 'मी तलाठी होणार!'

तिरकी टोपी घातलेला मुलगा म्हणाला, 'आपण नाही बुवा खेड्यात कुजणार. आपण शहरात जाऊन दुकानात कारकून होणार.'

भांग पाडलेला तिसरा मुलगा म्हणाला, 'मी सिनेमा थिएटरात नोकरी धरणार.'

चुणचुणित दिसणारा चौथा बोलला, 'आपण इंग्रजी शिकणार. मामलेदाराचा कारकून होणार.'

समोरच्या बाकावर नागपूरचे एक गृहस्थ बसले होते. त्यांच्याशी माझा नुकताच परिचय

झाला होता. ते गृहस्थ बरेच शिकलेले आणि विचारी होते. त्यांच्याजवळ एक शेटजी डुलक्या घेत होते. ते आपल्या चंचीतल्या पानाशी कानगोष्टी करत होते. अंधार वाढत होता. दुसऱ्या का तिसऱ्याच स्टेशनावर मुलं उतरून गेली.


मी नागपूरकराना म्हणालो, ‘ काय भाऊसाहेब, ऐकलेत का मुलांचे विचार ? ’

भाऊसाहेब म्हणाले, “ हं ऽऽ ! पळसाला पानं तीनच ! महाराष्ट्रात कुठंहि जा. एकच भाषा कानावर पडते. ”

आजोबानी सुपारीचे खांड तोंडात टाकलं. ते म्हणाले, ‘ मग काय करावं म्हणता या पोरानी ? शेती करा. सूत काता. लोक साक्षर करा. असा उपदेश सगळेच मोठे लोक करतात. तसाच उपदेश तुम्हीही करणार ना ? ’

भाऊसाहेब हसत हसत म्हणाले, ‘आपण शेती तर केलीच पाहिजे. पण ती हल्ली करतो तशी नाही. आपण नवीन पद्धतींचा उपयोग केला पाहिजे. नवीन खतं वापरली पाहिजेत. यंत्रावर चालणारी औतं आणली पाहिजेत. धरणं बांधली पाहिजेत. कालवे

काढले पाहिजेत. नद्यांचा जास्तीत जास्त उपयोग करून घेतला पाहिजे. आणि हे सर्व सहकारी पद्धतीनं केलं पाहिजे.'



आजोबा मधेच म्हणाले, 'पण सहकारी पद्धत म्हणजे काय ? सहकारी पद्धतीनं ही कामं कशी करायची ?'

भाऊसाहेब म्हणाले, 'सहकारी पद्धत म्हणजे सगळ्यांनी जमून एकोप्यानं काम करण्याची पद्धत. सहकारी तत्त्व म्हणजे एकजुटीनं काम करण्याचं तत्त्व. सहकारी पद्धतीनं काम करणारे शेतकरी एकत्र जमतात. गावातील शेतीची कामं वाटून घेऊन

करतात. पण माझं म्हणणं एवढंच नाही. आपण जीवनाकडं नवीन नजरेनं पहायला शिकलं पाहिजे. नव्या दृष्टीनं पाहिलं पाहिजे. उद्याचं जग यंत्रांचं आहे हे आपण ओळखलं पाहिजे.'

भाऊसाहेबांच्या शेजारचा शेटजी मधेच म्हणाला, 'अरे, उद्योगधंदा करा की आमच्यासारखा!'

आजोबा म्हणाले, 'कांहीही केलं तरी सरकारनं नको का मदत करायला?'

भाऊसाहेब आवेशाने म्हणाले, 'आपलं चुकतं ते इथंच. सरकारवर भार टाकून स्वस्थ बसणं चुकीचं आहे. सरकार आज थोडी मदत करीत आहे. उद्या अधिक करील. पण आधी जनता जागी झाली पाहिजे. त्याशिवाय त्या मदतीचा कांही उपयोग होणार नाही. मघाची मुलं किंवा आजचे तरुण खूप शिकतात. कारकुनीसाठी वणवण भटकतात. पण मेलेल्या जनावरांची हाडं गोळा करावीत. हाडांचं खत तयार करावं. शिंगांच्या गुंड्या तयार कराव्या हे धंदे त्यान सुचत नाहीत. नोकरीसाठी जोडे फाडतील. पण फाटक्या जोड्यापासून सरस तयार करणार नाहीत!

महाराष्ट्रात हिरडा व बाभळ पुष्कळ आहे. कातडी कमावण्याचा धंदा काढता येईल. कमावलेल्या कातड्याच्या अनेक वस्तु तयार करता येतील.'

आजोबा अधीरतेने म्हणाले, 'पण हे लहान धंदे आहेत. यांच्यावर शहरी लोकांची गुजराण होईल ?'

भाऊसाहेब म्हणाले, 'शहरातहि सहकारी पद्धतीनं हे चालतील. मोठ्या प्रमाणावर चालविता येतील. पण ते शहरातच काढले पाहिजेत असं नाही. खेड्यातसुद्धा हे धंदे करता येतील. शेतकऱ्याला जोडधंदे म्हणून इतरही धंदे करता येतील. मध गोळा करणं, कोंबड्या पाळणं, दुधाची डेरी काढणं, हे धंदे नवीन पद्धतीनं करता येतील. सहकारी पद्धतीनं करता येतील.'

मी म्हणालो, 'फळं टिकविणं, फळं पाकविणं, भाज्या सुकविणं, हे धंदेसुद्धा सहकारी पद्धतीनं करता येतील.'

भाऊसाहेब म्हणाले, 'आंब्यासारखी फळं हवा काढून घेतलेल्या डब्यातून परदेशाला पाठविता येतील. अहो, करणाऱ्याला काय कमी ? अनेक धंदे

आहेत. शेंगांची फोलपटं वाया जातात. उसाच्या चोयट्या आपण टाकतो. फोलपटापासून आणि चोयट्यापासून पुठ्ठा तयार करता येतो. पण याची माहिती कोण घेतो ?'

कोकणी आजोबा म्हणाले, 'आमच्या कोकणात तर असे खूप धंदे चालतील. यंत्रावर चालणाऱ्या बोटीतून मासेमारी करता येईल. मासे हवाबंद डब्यातून बाहेर पाठविता येतील. माशापासून तेल काढता येईल. खत तयार करता येईल.'

भाऊसाहेब म्हणाले, 'काजूच्या फोलपटापासून वगण तयार करता येईल. जंगली लाकडापासून डांबर तयार करता येईल. माडाला तर कोकणची कामधेनूच म्हणतात.'

कोकणी आजोबा मधेच म्हणाले, 'पिढ्यान् पिढ्या माडाखाली आम्ही राहतो. पण अजून आम्ही भिकारीच आहोत. तुम्ही म्हणता तेच खरं साहेब. आम्हाला अजून नवे विचार कळले नाहीत. आम्हाला अजून नवी दृष्टी आली नाही.'

भाऊसाहेब आनंदाने म्हणाले, 'तसं झालं तर! आंब्याच्या बाठीसुद्धा फुकट जाणार नाहीत!

त्यांच्यापसून अन्न तयार करता येईल. म. गांधींचं असंच मत होतं. पण तिकडं लक्ष देतो कोण ?'

कुठल्यातरी स्टेशनावर गाडी उभी राहिली. आजोबानी कुरकुरीत चुरमुरे व शेंगदाणे विकत घेतले. आम्हाला त्यानी थोडे थोडे दिले.

चुरमुऱ्यांची मूठ तोंडांत टाकत मी म्हणाले, 'भाऊसाहेब, आपण धंदे खूप सांगितले. मोठे कारखाने काढायला कोळसा लागतो. कोळशाशिवाय हे धंदे कसे चालणार ? महाराष्ट्रात कोळशाच्या खाणी कुठं आहेत ?'

सर्वच मंडळी आतुरतेने ऐकत होती. भाऊ-साहेब हसत हसत म्हणाले, 'नसेना आपल्याजवळ कोळसा ? सह्याद्रीवरून खूप पाणी फुकट वाहून जातं. त्या पाण्याचा उपयोग करून घेतला पाहिजे. ते पाणी बांध घालून आडविलं पाहिजे. आणि त्या पाण्यावर वीज तयार केली पाहिजे. जपान देशात लोकानी अशीच आपली अडचण दूर केली. अहो, उद्या कोयनेचं धरण पुरं होईल. आणि मग पाहा महाराष्ट्राचा मुखडा कसा खुलेल तो !'


आजोबा म्हणाले, ‘ सह्याद्रीच्या पाण्यावर मोठ्या प्रमाणात वीज तयार झाली पाहिजे. प्रत्येक खेड्यात वीज हसली पाहिजे बघा ! ’

भाऊसाहेब म्हणाले, ‘ तसं झालंच पाहिजे. तसं झालं म्हणजे खूप कारखाने निघतील. नवी नवी यंत्रं तयार होतील. कोकणात कागदाचे कारखाने निघतील. जहाजं बांधण्याचे कारखाने समुद्राच्या किनाऱ्याला दिसतील. आज हे सारं स्वप्नासारखं वाटतं. पण नवी दृष्टी आली आणि आपण सहकारानं काम करू लागलो तर हे स्वप्न खरं ठरेल. महाराष्ट्र सुखी होईल. सुंदर होईल. ’

मी म्हणालो, ‘ भाऊसाहेब, आपण म्हणता ते सगळं होईल. पण आमच्या लोकात नवी दृष्टी यायची कशी ? ’

भाऊसाहेब म्हणाले, ‘ शिक्षणाचा प्रसार खेड्यातून फार मोठ्या प्रमाणावर झाला पाहिजे. निरक्षर प्रौढ साक्षर झाले पाहिजेत. त्यांच्यात वाचनाची गोडी निर्माण झाली पाहिजे. शाळातून धंदे-शिक्षणाची सोय सरकार करीत आहे. त्याचा फायदा खेडुतानी घेतला पाहिजे. आपल्या खेड्यांची भरभराट आपणच

केली पाहिजे. खेडं आपलं आहे, देश आपला आहे, ही भावना प्रत्येकाच्या मनात रुजली पाहिजे. तरच



नवी दृष्टी आली असं म्हणता येईल. मग महाराष्ट्र श्रीमंत होईल.

बोलता बोलता भाऊसाहेब थांबले. एखादं गोड गाणं ऐकताना आनंद वाटतो, तसा आनंद भाऊसाहेबांचं बोलणं ऐकताना मला वाटला. बोलणं आणखी ऐकत रहावं असं वाटत होतं. एवढ्यात स्टेशनचे दिवे दिसू लागले, असं कोणीतरी म्हणाले. ते किती दूर आहे पाहावं म्हणून मी बाहेर डोकावले. आकाशात चंद्रकोर हसत होती. उद्याच्या महाराष्ट्राचं सुंदर स्वप्न मी पहात होतो. मी गुणगुणू लागलो,

'जाइ-जुईच्या शेवंतीच्या सुखकारी देशा....'



म. प्रं. सं. ठाणे, ग्रन्थालय शाखा.
क्र. क्र. 8808 नों. दि ..........
वि. वा.वा. ... क्र. ..........

( महाराष्ट्र प्रादेशिक लोकशिक्षण समितीच्या सौजन्यानें )

●● प्रकाशक ●●
व्ही. आर. शिगरे,
विद्या प्रकाशन,
४५० बुधवार पेठ, पुणें २.

●● मुद्रक ●●
व्ही. आर. शिगरे
सर्वोदय मुद्रणालय,
४५० बुधवार पेठ, पुणें २.

IRBK-0108808

IRBK-0108808

Adarsh Book Binding Works